# भेट

**(पूर्वप्रसिद्धी: अंतर्नाद, सप्टेंबर २०१६)**

नुकतंच भारतात गेलो होतो तेव्हाचा प्रसंग. मुंबई  एअरपोर्ट. सामान घेवून कस्टम्समधून बाहेर आलो. नेहमी बाहेर आल्याआल्या  घरच्या  रस्त्याला लागायची घाई असते. पण या वेळी गाडी यायला थोडा वेळ होता, म्हणून एक्झिट गेटच्या बाहेरच   उभा राहिलो. बऱ्याच फ़्लाईटस आल्या होत्या, त्यामुळं लोकांची भरपूर गर्दी होती. आतून येणारे प्रवासी बाहेरच्या गर्दीत आपल्याला न्यायला आलेले लोक कुठं दिसतायत, हे शोधक नजरेनं बघत बाहेर येत होते. बाहेर रिसीव्ह करायला आलेले लोकही आतून येणाऱ्यांमध्ये आपले लोक कधी दिसतायत याची उत्सुकतेनं वाट बघत होते.  दोन्हीकडची नजरभेट झाली की एखादं इलेक्ट्रिकल सर्किट पूर्ण व्हावं आणि दिवा लागावा तसे लोकांचे चेहरे एकदम उजळून निघत होते. ते बघायला खूप छान वाटत होतं. पु. लं. च्या ‘काही अप काही डाऊन’ या रेल्वेच्या पार्श्वभूमीवरच्या लेखातल्या ओळी आठवत होत्या: “ हवा असलेला पाहुणा फलाटात शिरत्या गाडीच्या दारात उभा दिसला की घ्यायला आलेल्या माणसांचे चेहरे कसे रुंदावतात. हे चेहरे काळेगोरे कसेही असले तरी अशावेळी सुंदर दिसतात. बाकी माणसाला माणसानं ‘याsss’ म्हणणं यासारखं दुसरं काय अधिक मोहक आहे?”

लोक बाहेर येत होते. आप्तेष्टांबरोबर, मित्रपरिवाराबरोबर त्यांच्या गळाभेटी, हस्तांदोलनं, नमस्कार चालू होते. एक बहुदा परदेशी शिकायला असलेली मुलगी बाहेर आली. कदाचित पहिल्यांदाच घरी सुट्टीवर येत असावी. तिला घ्यायला तिचा सगळा परिवार आणि बरेच मित्रही आले होते. सगळ्यांनी लगेच तिच्याबरोबर सेल्फिज घ्यायला सुरुवात केली. एक तरूण जोडपं त्यांच्या अगदी तान्ह्या बाळाला घेवून बाहेर आलं. बाळाला बघताच त्यांना आणायला आलेल्या लोकांमध्ये आनंदाचं कारंजंच उसळलं. बाळाला जवळ घ्यायची, त्याचे मटमटा मुके घ्यायची सगळ्यांना एकदम घाई झाली. एक पांढरी साडी नेसलेली, खंगलेल्या चेहऱ्याची म्हातारी बाई काठी टेकत हळूहळू बाहेर आली. एका मध्यमवयीन जोडप्यानं तिच्याजवळ जाऊन तिला मिठी मारली. तिघांच्याही डोळ्यातून घळाघळा अश्रू वहायला लागले. बऱ्याच महिन्यांनंतर, कदाचित काही वर्षांनंतर होणाऱ्या या सगळ्या भेटी असणार. पण सगळ्याच भेटी काही एकसारख्या नव्हत्या. प्रत्येक भेटीमागं निराळी कहाणी होती. कुठं दूरदेशी रहाणारं जवळचं माणूस थोडे दिवस भेटीला येत होतं, तर कुठं कुणाचा वियोगाचा लांबलचक काळ संपला होता. कुठं मधल्या काळात एखाद्या गोष्टीचा शेवट झाला होता, तर कुठं नवीन गोष्टीची सुरुवात. मधल्या काळात घडलेल्या चांगल्या, वाईट, सुखाच्या, दु:खाच्या, शुभ, अशुभ… सगळ्या घटनांचा अर्कच भेटीतल्या पहिल्या दृष्टीक्षेपामध्ये, पहिल्या मिठीमध्ये, पहिल्या आवेगामध्ये सामावला होता. कम्युनिकेशनच्या नवीन साधनांनी आपण जवळ आलो आहोत, असं कितीही वाटत असलं तरी ती साधनं या अशा घट्ट भेटींची जागा कधीच घेवू शकणार नाहीत. गंमत वाटली- इथं ‘अराईव्हल्स’ मध्ये हे चित्र तर एक लेव्हल खाली ‘डिपार्चर्स’ मध्ये याच्या उलटं चित्र असणार. वेगवेगळ्या भावनांचं एक जिवंत कोलाजच एअरपोर्टच्या त्या जागेत साकार होत होतं.

हे सगळं समोर पहाताना जाणवलं की यावेळी भारतात दोनच आठवड्यांचा मुक्काम. मग लगेचच परत जायचं आहे. एकदम उगाचच थोडी खिन्नता वाटली. पण मग एक विचार चमकून गेला. आपण बरेच सुदैवी आहोत. परदेशी शिकायला, नोकरीला जाऊ शकतो, वर्षा दोन वर्षांतून भारतात येवू शकतो, घरच्यांना भेटू शकतो. पण असेही बरेच लोक आहेत की जे त्यांच्याच कुटुंबातल्या लोकांपासून वर्षानुवर्षं दुरावलेले असतात, जे स्वत:ची स्वप्नं पुरी करू शकत नाहीत, आयुष्य मनासारखं जगू शकत नाहीत, मध्येच त्यांच्या आयुष्याची उलथापालथच होवून जाते. आणि यामागं गरिबी, शिक्षण यासारखी त्यांच्या प्रयत्नांनी कदाचित दूर करता येतील अशी कारणं नसतात; मृत्यू किंवा एखाद्या नैसर्गिक आपत्तीसारखीही ती कारणं नसतात की ज्याचं खापर नियतीवर किंवा निसर्गावर फोडता येईल. कारणं मानवनिर्मितच असतात आणि तरी त्यावर त्या बिचाऱ्यांचा कोणताही कंट्रोल नसतो.

मुंबईच्या अमेरिकन कॉन्सुलेटमध्ये बरीच वर्षं तिकडे असलेल्या मुलाकडं जायचा व्हिसा सातव्यांदा की आठव्यांदा रिजेक्ट झाला म्हणून ओक्साबोक्शी रडत गेलेलं एक वृद्ध मुस्लीम जोडपं मी पाहिलं होतं, तेव्हा खूप त्रास झाला

होता. वाटलं होतं की ही पासपोर्ट, व्हिसाची बंधनं कशाला हवी आहेत? जर सगळं विश्व हे आपलंच घर असेल, जर जग हे ग्लोबल व्हिलेज झालं असेल, तर आपल्याच घरात कुठंही फिरायला कुणाच्यातरी परवानगीचा शिक्का कशाला हवा आहे? पण आजूबाजूची परिस्थिती पाहिली की असलं स्वप्न पहाणं सुद्धा वेडगळपणाचं वाटू लागतं. जिथं लोकांना एकत्र आणण्याऐवजी जात, धर्म, वर्ण, सेक्शुअल आयडेंटिटि, राष्ट्रीयत्व यांचा आधार घेवून त्यांच्यात जास्तच दुरावा निर्माण करायचा आणि स्वत:च्या फायद्यासाठी त्यांच्या मनात परस्परांविषयी भीती आणि द्वेष निर्माण करायचा, या दृष्टीनंच  बऱ्याच जणांचे प्रयत्न चालू असतात, तिथं विश्वबंधुत्व वगैरे कल्पना हास्यास्पदच ठरतील, नाही का?

पण मग आपण एक करू शकतो. बाकीच्यांचं सोडा, आपण स्वत:चं वागणं तरी बदलू शकतो. कुठलाही पूर्वग्रह न बाळगता, समोरची व्यक्ती ही फक्त “माणूस” आहे या भावनेनं आपण सगळ्यांशी वागायचा प्रयत्न केला, शक्य असेल तिथं चांगुलपणा, सहानुभूती, मदतीची इच्छा आणि तयारी यांचा अंतर्भाव आपल्या वागण्यात करायचा प्रयत्न केला, तरी भरपूर होईल. आणि हे करणंही तितकं सोपं नाही. दहा लोकांशी असं वागलं तर कदाचित एकाकडून तरी प्रतिसाद मिळेल. सगळ्या जगाचा ठेका आपल्याला घ्यायची काय गरज आहे, आपल्या आजूबाजूच्या जगासाठी जरी आपण इतकं करू शकलो तरी हळूहळू फरक पडू लागेल, नाही का?

तुम्हाला काय वाटतं? प्रयत्न करायला काय हरकत आहे?

गौतम पंगू